**रे.दि.मू.नं. १९/२०११ मधील नि. ७६ खालील आदेश**
**( सिताराम मदने विरूध्द जगु मदने तर्फे मयत वारस )**
**(आदेश पारीत दि. २५/०२/२०२०)**

नि. ७६ वरील प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. १अ ते १क विरूध्द झालेला विनाकैफियत (No.W.S ) आदेश रद्द होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जास वादीने म्हणणे मागविणेत आले. वादींनी सदर अर्जास नि. ८१ वर म्हणणे दाखल केले आहे.

२. अर्ज, व दस्तऐवज याचे अवलोकन केले. नि. ७६ मध्ये नमूद केलेली कारणे विचारात घेता वादी व प्रतिवादी यांचेमधील अंतिम वाद निकाली काढणेकरिता प्रतिवादी नं. १अ ते १क विरूध्द झालेला विनाकैफियत (No.W.S) चा आदेश रद्द करणे व त्यांना कैफियत व म्हणणे दाखल करणेस संधी देणे योग्य वाटते. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. ७६ चा अर्ज र.रु. ५००/— कॉस्टवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी नं. १अ ते १क विरूध्द झालेला विनाकैफियत (No.W.S) आदेश रद्द करणेत येतो.

३. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

**दि. २५/०२/२०२०**

**( अ.ब.चव्हाण )**
**सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**खंडाळा.**